अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र:-१/७७७
दिनांक :- २६/०५/२०१६

अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज)कार्यालय
पुणे महानगरपालिका,पुणे-५,
जा.क्र :- अतिमआ(ज)/उआ(साप्र)/आस्था/१२३४
दिनांक :- २६/०५/२०१६

**-: आ ज्ञा प त्र :-**

विषय :- अभियांत्रिकी संवर्गातील "उप अभियंता(विद्युत) " या पदावरील सेवकांच्या बदलीबाबत.

संदर्भ :- मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठ.क्र.१/७७६ दिनांक २६/०५/२०१६

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील " उप अभियंता (विद्युत)" या पदावरील सेवकांची खालील तपशिलानुसार त्यांच्या नावापुढे नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय कामकाजाचे सोयीसाठी या आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून बदली करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | सेवकांची नावे व हुद्दा | सध्याचे खाते | बदलीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. तडाखे लालासाहेब संभाजी | विद्युत विभाग | परिमंडळ क्र.१ | नवनिर्मित रिक्त जागी |

उप अभियंता (विद्युत) या पदावरील सेवकांच्या सदर आज्ञापत्रान्वये बदल्या करण्यात आल्या असून उपरोक्त अधिकारी/सेवक त्यांचे बदली खात्यात हजर न होता बदली पूर्वीच्याच खात्यामध्ये कामकाज करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास तसेच सदर आज्ञापत्रानुसार संबंधित सेवक बदली खात्यात हजर न झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित खातेप्रमुख यांनी त्यांचे विरुध्द शिस्तभंगाचा प्रस्ताव सादर करुन त्याबाबतचा अहवाल तात्काळ मा. महापालिका आयुक्त यांजकडेस सादर करावा.

१) वरील सर्व सेवकांना या आज्ञापत्रानुसार बदली विभागात रुजु होण्यासाठी दिनांक २७/५ /२०१६ रोजी मध्यान्हपुर्व वेळेपासून कार्यमुक्त करण्यात आले आहे,असे समजण्यात यावे.

२) वरील सेवक बदली खात्यात रुजु झाल्याचे निवेदन संबंधीत खातेप्रमुख यांनी दिनांक २७ / ५ /२०१६ रोजी उप आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागाकडे सादर करावा.

३) मा.मुख्य सभा ठराव क्र. ५७७, दिनांक २१/१/२००४ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या अटीनुसार बदली करण्यात आलेल्या अधिकारी यांनी बदली रद्द करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा

अन्य प्रकारे दबाव प्रशासनावर आणू नये. सदर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल तसेच त्यांचे विरुध्द योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

४) या आदेशा व्यतिरिक्त प्रत्यक्ष कामकाजाच्या खात्यामध्ये बदल केल्यास संबंधीतांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

५) या आज्ञापत्रान्वये बदल्या करण्यात आलेल्या सेवकांचे दिनांक ०१/०५/२०१६ पासूनचे वेतन बदलीने नियुक्त केलेल्या खात्याने आदा करावयाचे आहे.

वरील सेवकांना नियमानुसार वेतन व भत्ते आदा करण्यात यावेत व दरमहाचे वेतन मुळ नेमणूक खात्याने अदा करावयाचे आहे.

तरी, संबंधित मा.खातेप्रमुख यांनी वरील बाबत पुढील जरुर ती तजविज करावी.

25/05

(राजेंद्र जगताप)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज)**
पुणे महानगरपालिका.

प्रत/-
**सर्व संबंधीत अधिकारी**
**मा.संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख,**
**पुणे महानगरपालिका.**

**यांजकडे पुढील तजविजीसाठी रवाना...**

(मंगेश जोशी)
**उप आयुक्त**
**(सामान्य प्रशासन)**
पुणे महानगरपालिका.